Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 35 – 38
DOI: 10.5281/zenodo.10072327

Original Research Article

# महात्मा गांधीजी आणि ग्रामस्वराज्य

प्रा. डॉ. विजयकुमार गणपतराव तांबारे

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर ४१३५२७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vtambare73@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 21 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रास्ताविक

महात्मा गांधींजींची स्वराज्य ही कल्पना आदर्शाकडे जाण्याची एक पायरी आहे तसेच आदर्शापर्यंत जाणारा सर्वात जवळचा मार्ग आहे. आदर्श राज्य निर्माण करण्यासाठी, राजसत्तेच्या महत्वकांक्षेचा पूर्ण अभाव असलेला अहिंसक समाज निर्माण करण्याकरीता विकेंद्रीकरण हाच एकमेव उपाय होता. गांधीजींनी आपल्या ग्रामराज्याच्या कल्पनेत ग्राम हा नियोजनाचा केंद्रबिंदु मानला होता ग्रामीण नियोजनाला जी काही मदत लागेल ती देणे होय. एवढे केंद्रसत्तेचे काम आहे असे गांधीजींना अभिप्रेत होते. महात्मा गांधीच्या मते खग्रा भारताचे दर्शन शहरा मध्ये नाही तर खेडयामध्ये घडते. त्यामुळे प्रत्येक खेडे हा या नव्या रचनेचा केंद्रबिंदु असले पाहिजे. भारतातील स्वायत्त असलेली खेडी स्वयस्फुर्त सहकार्यांच्या बळावर आपापल्या गरजाभागवू शकतील. त्यामुळे प्रतिष्ठापूर्ण व शांततामय सहजीवन व्यतीत करता येईल.

भारताच्या स्वातंत्र्याची सुरुवात तळागळातील घटकापासून व्हावी असे गांधीजीना अभिप्रेत होते. भारत हा खेडयांचा देश आहे. महात्मा गांधींजीच्या म्हणतात देशभरातील खेडयांचा विकास झाला तरच संपूर्ण भारत देशाच्या विकास होईल. जनतेचे कल्याण करण्यासाठी हे राज्य जनतेचे असणे आवश्यक असते. म्हणून भारताने लोकशाही पध्दतीचा स्विकार केला होता. गांधीजीं यांच्या विचारातील ग्रामस्वराज्य संकल्पनेत खेडयांचा विकास हाच केंद्रबिंदु होता. विकेंद्रीत लोकशाहीचा पुरस्कार करून त्यांनी आदर्श अशा ग्रामराज्याची कल्पना मांडली. महात्मा गांधींच्या मते शहरीकरण व उद्योगधंदे यांच्या वाढीमुळे उद्योगधंदे ज्यांच्या मालकीचे त्यांच्याच हातात संपत्तीचे केंद्रीकरण होते ते टाळण्यासाठीच स्वराज्यात खेडयांना स्वायत्तता दिली पाहिजे.

## शोधनिबंधाचा उद्देश

१. महात्मा गांधीची ग्राम स्वराज्याची संकल्पना अभ्यासणे.

२. महात्मा गांधींजीच् यांच्या ग्रामस्वराज्य या संकल्पना विषयीच्या अपेक्षा अभ्यासने.

३. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्या विषयीच्या मतांचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती**

या विषयाच्या शोधनिबंधासाठी दुय्यम साहित्याचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध ग्रंथ वार्षिक अंक, त्रैमासिकांचा, मासिक, वर्तमानपत्र, साप्ताहिक, स्मरणिका अशा लिखीत साहित्याचा वापर या शोधनिबंधासाठी केला आहे.

**महात्मा गांधीजीची खेडयांविषयीची कल्पना**

महात्मा गांधीजीच्या मते, भारतातील खेडे स्वयंपूर्ण असली पाहिजेत. तसेच खेड्यातील प्रत्येक व्यक्तीच्या प्राथमिक गरजांची पुर्तता खेड्यातच झाली पाहिजे. त्यासाठी त्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व वस्तुचे उत्पादन खेडयात झाले पाहिजे यावर त्यांचा भर होता.त्यासाठी स्थानिक संसाधनाचा योग्य प्रमाणात वापर व्हायला पाहिजे. ते म्हणतात "प्रत्येक गावाला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी स्वत:च्या गरजा पूर्ण कराव्या लागतील जेणेकरून ते आपला संपूर्ण व्यवसाय स्वत:च्या बळावर चालवू शकतील. इतका की तो संपूर्ण जगापासून स्वतःचे रक्षण करू शकेल" संपूर्ण खेडे हे स्वयंपूर्ण झाले पाहिजे. त्यासाठी गांधीजीनी स्वातंत्र्याच्या अगोदरपासूनच भर दिलाआहे. त्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेची आखणी व्यवस्थित केली जावी. स्वदेशी वस्तूच्या वापराबरोबर चरखा, खादी ग्रामोद्योग व त्याव्दारे आर्थिक स्वावलंबनाचे हे सुत्रच प्रत्येक गावात राबविले जावे असे गांधीजीचे स्पष्ट मत होते.

**महात्मा गांधीजींचे स्वयंपूर्ण ग्रामस्वराज्याचे घटक**

**१. समता**

खेड्यातील प्रत्येकाला प्रगती करण्यासाठी समान संधी मिळाली पाहिजे तसेच ग्रामस्वराज्यातील प्रत्येक व्यक्ती सारखीच व समान दर्जाची असेल म्हणजेच समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच्च असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव असणार नाही.

**२. समाजवर्तन**

महात्मा गांधीना अभिप्रेत ग्रामस्वराज्यातील समाजात स्वंयपूर्णता असेल.खेड्यात राहणारा समाज पुर्णपणे निर्व्यसनी असला पाहिजे.ग्रामस्वराज्याचा मुख्यआधार हा नैतीकता व अध्यात्मिकता असलाच पाहिजे यावर म. गांधींजींचा भर होता. गावातील प्रत्येक व्यक्तीचे वर्तन आदर्श प्रकारचे असले पाहिजे जेणेकरून त्यांच्यासाठी दंडव्यवस्था निर्माण करण्याची राज्यसंस्थेला गरज ही भासणारच नाही.

**३. श्रमाला महत्व**

महात्मा गांधीजींनी आपल्या ग्रामस्वराज्य या कल्पनेत श्रमाला खुप महत्वाचे स्थान दिले आहे. त्यामुळे खेड्यातील वर्गव्यवस्था समुळ नष्ट होईल असे त्यांचे म्हणणे होते. खेड्यामध्ये व्यवसायाच्या समानतेचे तत्व स्विकारल्यामुळे सर्वांना समानता प्राप्त होईल त्यामुळे समाज शोषनविरहित आणि कमीत कमी गरजा असलेला राहिल असे मत मांडले. श्रमाला महत्व आल्यावर शांततेचे आणि प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची परिस्थिती आपोआप निर्माण होईल कारण प्रत्येक नागरिक कामात व्यस्त असेल त्यांना विनाकारण विचार करण्यास वेळच राहणार नाही.

**४. शिक्षण व्यवस्था**

महात्मा गांधीजीनी शिक्षण हे चांगला माणूस बनविण्यासाठी असले पाहिजे त्यामुळे शिक्षण हे उद्योग देणारे साधन बनेल. तसेच शिक्षण हे व्यक्तीचे शरिर, बुध्दी व मन यांचा समतोल साधून व्यक्तीमत्व विकासाचे साधन असल्याने गांधीजींनी मुलभूत शिक्षणावर अधिकच भर दिला आहे. प्राथमिक शिक्षण मोफत, सक्तीचे व मातृभाषेतून असले पाहिजे. शिक्षण हे मुलांच्या वयाच्या ७ व्या वर्षापासून १४ व्या वर्षापर्यंत देण्यात यावे. शिक्षणामुळे समाजात मोठ्या प्रमाणात समता प्रस्थापित होण्यास मदत होते असे म. गाधींजींना वाटत होते.

**५. ग्रामोद्योग**

महात्मा गांधींच्या मते,खेड्यातील दारिद्रय घालवण्यासाठी गावातच प्रत्येकाला पुरेसा रोजगार उपलब्ध होणे गरजेचे आहे. कारण बेकारीच्या उच्चाटनातूनच दारिद्रय निर्मूलन शक्य होईल. ग्रामीण उद्योगांमध्ये मुख्यतः लघु आणि कुटीरोद्योगाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले पाहिजे. कारण यामध्ये मालक आणि कामगार बऱ्याच प्रमाणात एकच असतो. ग्रामउद्योगात प्रामुख्याने बैल घाण्याचे तेल, पेंड, तांदुळ, मध गोळा करणे, खेळणी, चटण्या, साबण, हातमाग, कागद इत्यादी ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणे व त्यांचा विकास घडवून आणण्यावर गांधीजी भर देताना दिसून येतात.

आज शेतकरी लोकांना जीवन जगने कठिण होत आहे. शेती पिकत जास्त नाही पिकली तर शेतमालाला भाव नाही यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे लाखो शेतकय्रांनी आत्महत्तेचा मार्ग निवडला आहे. ग्रामीण क्षेत्रात आजही शैक्षणिक मागासलेपण असल्याने बेरोजगारी, उपासमारी, अस्वच्छता, विषमता अशा वेगवेगळया समस्या खुप प्रमाणात दिसून येतात. ग्रामपंचायत ही ग्रामवासियांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यास पुर्णपणे असमर्थ ठरत आहे असे दिसून येते.

**महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्या बद्दलच्या अपेक्षा**

भारत स्वांतत्र्य झाल्यानंतर ग्रामस्वराज्य संकल्पनेच्या बाबतीत महात्मा गांधी खुप आशावादी होते ते म्हणत -

१. ग्रामस्वराज्य स्वंतत्र भारतामध्ये कोणीही प्राथमिक गरजां बाबत राजकर्त्यावर अवलंबून असणार नाही. तसेच इतर गरजासाठी तो सहकार्य द्यायला व सहकार्य करायलाही कचरणार नाही. “समाजाचा मुळ घटक खेडे आहे. हे बळकट असले पाहिजे. स्वयंपूर्णता हा महान शब्द आहे." अशा व्यवस्थेत प्रत्येक खेडे स्वतःच्या गरजेपुरते धान्य आणि वस्त्र पुरेल इतका अन्नधान्य आणि कापुस पिकविल.
२. प्रत्येक गावी स्वतःची शाळा, सभागृह व नाटयगृह असले पाहिजे.
३. गावातील सर्वांकरिता पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असेल.
४. अथपासून ते इतिपावेतो पर्यंतचे सर्व शिक्षण हे बुनियादी पध्दतीचे असेल.
५. महात्मा गांधींना अभिप्रेत ग्रामस्वराज्यात जात-पात-पंथ, अस्पृश्यता हा भेदभाव असनार नाही.
६. सर्वसामान्य विशिष्ट नियमान्वये पंचाची नेमणुक केला जाईल.
७. गावात भंगी सुतकातणार, चौकीदार, वैद्य, शिक्षक, कवी, शिल्पकार, भाषापंडित संशोधक व विकसित होत जाणारी बाजारपेठ असेल.

**निष्कर्ष**

१. खेडेगाव हा भारताच्या ग्रामस्वराज्याचा आत्मा आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या मुलभूत गरजा गावपातळीवर पूर्ण झाल्या पाहिजेत. म्हणजेच स्वावलंबी ग्राम ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.खेडेगाव परावलंबी असता कामा नये,असे मत गांधीचे होते. खेडे हे स्वयंपूर्ण असण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होताना दिसत आहेत. हे गांधी विचारांचेच यश आहे.
२. भारतातील खेड्यापाड्यात समतेची बीजे रुजविण्यासाठी गांधीनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेवर भर दिलेला दिसून येतो.
३. भारतातील राज्यघटनेच्या 73 व्या घटनादुरुस्तीनुसार खेडे स्वावलंबी बनावे म्हणून ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात अधिकार दिलेले दिसत आहेत. हे गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेचे यश आहे.
४. महात्मा गांधीजींच्या खेड्यातील दारिद्र्य नष्ट करण्यासाठी प्रत्येकाला गावपातळीवरच रोजगार उपलब्ध करून देणे गरजचे आहे. परंतु आज सरकारने खेडयापेक्षा शहरावर जास्त लक्ष केंद्रीत केल्याने खेडयांची अद्योगती मोठया प्रमाणात होत असलेली दिसून येते. खेड्यातील रस्त्याची अवस्था बिकट आहे, खेड्यातील शिक्षणासाठी

ही विषेश प्रयत्न करत नाहीत म्हणून खेडे ओसाड पडत आहेत हे केवळ गांधी विचारांकडे दुर्लक्ष केल्याचे परिणाम आहेत.

५. महात्मा गांधींनी स्वतंत्र भारता करिता स्वयंपूर्ण व समृध्द भारताचे जे स्वप्न पाहिले होते. त्या सर्व अपेक्षा स्वातंत्र्यांनंतरच्या 75 वर्षानंतरही पूर्ण झालेल्या नाहीत. कारण नोकरशाहीत कागदोपत्री घोडे नाचवले जातात. या उक्तिप्रमाणे भ्रष्टाचाराने अंतःबाहय पोखरल्या गेलेल्या सदोष वितरण व्यवस्थेने गरीबासाठींचा पैसा हडप केला ही वस्तुस्थिती आहे.

**संदर्भ सूची**


१. सारथी अरून, शोध महात्मा गांधीचा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २०२३

२. प्रधान राम, महात्मा गांधी : एक शोध, मायबोली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २००६.

३. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१३

४. प्रा. डॉ. शुभांगी राठी, भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

५. भारतीय राजकीय विचारवंत, डॉ. व्हि. जी. कुलकर्णी, प्रा. कांत सोमवंशी,कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद.

६. प्राचार्य डॉ. डी. पी. देवरे, भारतीय राजकीय विचार, पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती २००८.

७. विपुल भोयरा, गांधीजींच्या संकल्पनेतील ग्रामविकास, गर्जा महाराष्ट्र माझा संपादकीय लेख दि.१०.०२.२०१२

८. पर्वते त्र्यं. वि., गांधींपर्व, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, १९८५.

९. पंडित नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०००.

१०. डॉ. ढोबळे रमेश, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१०.

११. देसाई नारायणभाई, मोहन ते महात्मा, गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव, २०२१